*नियमित दरखास्त क्र.०५/२०१९*
*वरुण शहा विरुध्द विठ्ठल कोंडे.*
*CNR NO.MHRG160001022019.*

**<u>निशाणी क्र.१० वरील आदेश.</u>**
(दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी पारीत)

दरखास्तदार/वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २१, नियम ३७ प्रमाणे ऋणको/प्रतिवादीस नोटीस काढणेकामी दाखल केलेला आहे.

०२. दरखास्तदार याचे थोडक्यात कथन असे की, त्याने सदरहु दरखास्त ऋणको/प्रतिवादीकडुन रे.मु.क्र.३७/२०१७ मधील हुकूमनाम्याप्रमाणे येणे असलेली रक्कम रुपये १,४५,७११/– अधिक दरखास्त दाखल तारशेपासुन द.सा.द.शे. ९% प्रमाणे व्याज वसूल होवून मिळणेकामी दाखल केली आहे. सदरहु दरखास्त दाखल केल्यानंतर सदरील ऋणको/प्रतिवादीस जंगम वॉरंट काढले होते परंतु त्याचेकडे कोणताही जंगम माल मिळुन आला नाही त्यामुळे सदर जंगम वॉरंटची बजावणी करता आली नाही. ऋणको/प्रतिवादीची देणे असलेली रक्कम भरण्याची आर्थिक ऐपत आहे परंतु तो जाणुनबुजून रक्कम भरण्याची टाळाटाळ करीत आहे. ऋणको/प्रतिवादी याचे घरातील व्यक्ती चांगल्या कमवत्या आहेत, परंतु सदर रक्कम भरणेची तो टाळाटाळ करीत आहे. तसेच त्यास अनेकवेळा संधी देण्यात आली परंतु त्याने रक्कम भरण्यासाची कोणतीही तजवीज केली नाही अथवा तसा रक्कम भरण्याचा प्रयत्न केला नाही. सबब, ऋणको/प्रतिवादीस दिवाणी तुरुंगात ठेवल्याखेरीज दरखास्तदार/वादीची रक्कम वसुल होणार नाही, म्हणून त्याने ऋणको/प्रतिवादीस दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २१ नियम ३७ प्रमाणे नोटीस काढणेचे विनंती केली आहे.

०३. अभिलेखाची पाहणी केली. दरखास्तदार/वादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दिनांक ०४.०७.२०१९ रोजी ऋणको/प्रतिवादीस दरखास्तीची काढण्यात आलेली नोटीस बजावून परत आल्यावर त्यास दिनांक १६.११.२०१९ रोजी जंगम वॉरन्टचा काढण्यात आला होता तो न बजावता परत आल्याचे दिसुन येते. सबब, दरखास्तदार/वादीचा अर्ज आदेश २१ नियम ३७ प्रमाणे ऋणको/प्रतिवादीस नोटीस काढण्यास पात्र आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. दरखास्तदार/वादीचा यांचा अर्ज नि.क्र.१० मंजूर करण्यात येतो.

०२. ऋणको/प्रतिवादीस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश २१ नियम ३७ नुसार नोटीस काढण्यात यावी.

**स्वाक्षरी/-**

**पाली.** **( मीना वामन जाधव)**

**दिनांकः १८ जुलै, २०२२.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाली.**